# वाशिम यशोगाथा

## ‘प्रधानमंत्री मुद्रा योजना’ मुळे मिळाले स्वयं रोजगार स्थापनेची प्रेरणा

नाव : योगेश खोडके

मोबाईल न. : ८८०५४८२२५३.

गाव : वाशिम

व्यवसाय : हेअरपोर्ट मेन्स पार्लर, वाशिम

योगेश खोडके......

व्यवसाय केस कापण्याचा.. केस कापणे पिढीजात व्यवसाय असून हलाखीची आर्थिक परिस्थिती मुळे इतरांकडे व्यवसाय न करता इतरांकडे नोकरी करून उदरनिर्वाहाच्या सततच्या प्रयत्नाने सुद्धा अपेक्षित यश मिळत नव्हते. याकाळातच देशातील लघु उद्योगांना सहज कर्ज पुरवठा व्हावा, या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ एप्रिल २०१५ रोजी २०,००० करोड रुपये भांडवल असलेली ‘मायक्रो युनिट्स डेव्हलपमेंट अँड रिफायनान्स एजन्सी’ अर्थात मुद्रा बँकेचे उद्घाटन केले. या संधीचा आणि योजनेचा सटीक लाभ व्हावा म्हणून योगेश ने बँक ऑफ महाराष्ट्र वाशिम शाखेला भेट दिली. वाशिम येथील रहिवाशी असलेला आणि जन्मताच गरिबीत दिवस काढलेल्या योगेश ने बँक ऑफ महाराष्ट्र द्वारे मुद्रा अंतर्गत मिळालेल्या ५० हजार रुपये कर्जामधून स्वतःचा व्यवसाय सुरु केला. नुकत्याच सुरु झालेल्या योजनेमधून योगेश ला अर्थसाह्य मिळाल्या मुळे तो कमालीचा प्रेरणा मिळाली आणि वाशिम सारख्या शहरामध्ये आज त्याने केस कापण्याच्या व्यवसायामध्ये उत्तुंग भरारी घेतली. आज घडीला त्याची एकूण गुंतवणूक ८ लाख आहे आणि माहे ५० हजार पेक्षा जास्त उत्पन्न प्राप्त करत आहे. योगेश णे स्वतःचा व्यवसाय स्वतः पुरता मर्यादित न ठेवता तो ७ ते ८ बेरोजगारांना सुद्धा रोजगार उपलब्धेचा पर्याय बनला आहे. सलाम योगेश ला आणि त्यांच्या ध्येर्याला.

